MHSI06-000862-2019

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.
४०२/२०१९
महा. शासन वि. अलका जाधव व. ४
न्यायनिर्णय
नि. क्र.२० लगत

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०४/०८/२०२६ रोजी घोषित)

आरोपी क्र.१ – अलका आत्माराम जाधव, २–आशा आत्माराम जाधव, ३–अर्जुन भिकाजी जाधव व ४–सखाराम नामदेव जाधव यांचेविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३४१, ४२७, ५०४ सह ३४ अन्वये संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभिलेखावरील पुरावा व आरोपीविरुध्द असलेले दोषारोप पाहता खालील मुदृदे विचारार्थी घेण्यात आले. त्यावरिल निष्कर्ष कारणमिमांसासहित खालील प्रमाणेः–

| अनु. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८/०४/२०१९ रोजी दुपारी १२.०० ते दिनांक १४/०४/२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या दरम्याने गांव मौजे माजगांव, जाधववाडी, ता. सावंतवाडी येथे आरोपी क्र. १ ते ४ यांनी एकमेकांच्या संगनमताने फिर्यादी यांचे घराचा दरवाजा काढून टाकून त्याठिकाणी चिऱ्याचे बांधकाम करुन त्यांच्या घरात प्रवेश करण्याचा मार्ग बेकायदेशीररित्या बंद केला व त्यायोगे त्यांनी | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड संहिता कलम ३४१ सह ३४ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| २ | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी एकमेकांच्या संगनमताने फिर्यादी यांचे राहते घराची भिंत पाडून तसेच दरवाजा काढून टाकून नुकसान केले व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ४२७ सह ३४ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ३ | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ४ यांनी एकमेकांच्या संगनमताने शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले की, अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा उद्देश होता व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह ३४ खालील शिक्षापात्र गुन्हा केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## **का र ण मि मां सा**

३.  याकामी अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप शाबीत करणेकरिता खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले आहेत.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | लक्ष्मण वसंत जाधव | पंच साक्षीदार |
| २. | पांडुरंग बुधाजी जाधव | फिर्यादी |
| ३. | महेंद्र सुर्याजी जाधव | प्रत्यक्षदर्शी  साक्षीदार |
| ४ | बाळकृष्ण विश्राम कदम | प्रत्यक्षदर्शी  साक्षीदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| **अनु.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

नि. ०९ लगत

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| ०१. | नि.क्र. २२–स. सा. क्र. १ | घटनास्थळ पंचनामा |
| ०२. | नि.क्र. २४–स. सा. क्र. २ | फिर्याद |

**ब) बचाव पक्ष :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| ०१. | नि.क्र. २७–स. सा. क्र. २ | कर आकारणी उतारा |

**क ) न्यायालयीन निशाणी :–**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील :–**

| **अनु.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **मुद्देमालाचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

४. आरोपी क्र. १ ते ४ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे जबाब नि. २० लगत नोंदविण्यात आलेले आहेत.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.१  ते ३ करिताः</u>**

६.   सदरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुर्नःरावृत्ती टाळण्याकरीता ते चर्चेसाठी एकत्रात घेण्यात आले आहेत. आरोपींविरुध्द असलेले  दोषारोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाच्या वतीने फिर्यादी पांडुरंग (साक्षीदार क्र.२) यांची साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, मौजे माजगांव येथे त्याचे वडीलोपार्जित घर आहे. सदर घराचे ‘अ’ व ‘ब’ असे दोन भाग असून त्यापैकी ‘अ’ भाग त्याची चुलत वहिनी सुमित्रा जाधव हिच्या वाटणीस तर ‘ब’ भाग त्याच्या वाटणीस आलेला आहे. घराच्या वाटणीबाबत ग्रामपंचायत माजगांव यांच्याकडे नोंदी झालेल्या आहेत. सन २०१९ पासून त्याची भावजय सुमित्रा ही वाटणीच्या कारणावरुन त्याला अटकाव करीत होती. त्यामुळे त्याने दिनांक १/३/२०१९ रोजी तंटामुक्ती समितीची बैठक बोलाविली होती. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे घराची विभागणी करणारी भिंत बांधुन घराचे  दोन भाग करण्यात आले होते. दिनांक १०/४/२०१९ रोजी तो मुंबई येथे असताना त्याचा चुलत भाऊ महेंद्र जाधव याने त्यास फोन करुन आरोपींनी सदर भिंत पाडल्याचे सांगितले. दिनांक ११/४/२०१९ रोजी फिर्यादी माजगांव येथे आला. दिनांक १४/४/२०१९ रोजी आरोपी क्र. १ व २ यांनी त्यास अटकाव केला व शिवीगाळ केली. सबब त्याने आरोपींविरुध्द फिर्याद (नि. २४) दिली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने स. नं. १७१ हि. नं. १२ बाबत सुमित्रा जाधव हिला संमतीपत्र लिहून दिले असल्याचे कबुल केले आहे. सुमित्रा जाधव हिचे एकच घर माजगांव येथे आहे व सदर खटल्यातील घर क्र. १६६१ चा कर आकारणी उतारा (नि. २७) वर सुमित्रा जाधव हिचे नांव आहे हे देखील कबुल केले आहे.

७.   साक्षीदार क्र. ३ महेंद्र हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. त्याने पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, दिनांक १०/४/२०१९ रोजी सुमित्रा जाधव यांच्या घरी तोडफोड

होत होती. त्यावेळी फिर्यादी मुंबईला गेला होता. आरोपींनी घर नं. ४५५ मध्ये असलेली भिंत काढून टाकली होती व दरवाजे व खिडक्या फेकून दिल्या होत्या. उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने तो फिर्यादीचा चुलत भाऊ आहे व त्याच्या अडीअडचणीत फिर्यादी धावून येतो हे कबुल केले आहे.

८. साक्षीदार क्र. ४ बाळकृष्ण याने त्याच्या पुराव्यात कथन केले आहे की, दिनांक १०/४/२०१९ रोजी आरोपीच्या घरी तोडफोड सुरु होती. आरोपी घरातील भिंत पाडत होते व चिरे बाहेर काढून ठेवत होते. उलटतपासा दरम्यान सदर साक्षीदाराने फिर्यादी त्याचा चुलत मामा आहे हे कबुल केले आहे. तसेच आरोपी व त्याच्या कुटुंबामध्ये पहिल्यापासून वाकडीक आहे हे देखील कबुल केले आहे.

९. साक्षीदार क्र. १ लक्ष्मण हा घटनास्थळ पंच आहे. त्याने त्याच्या पुराव्या दरम्यान कथन केले आहे की, दिनांक १४/४/२०१९ रोजी पोलिसांनी त्यास पंचनाम्यासाठी फिर्यादीच्या घरी बोलाविले होते. फिर्यादीच्या घराचा नंबर ४५५–ब असा आहे. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा (नि. २२) कबुल केला आहे. तसेच घटनास्थळ पंचनामा हा फिर्यादीने सांगितला आहे असे देखील कबुल केले आहे.

१०. अभिलेखावर आलेल्या साक्षीदारांच्या तोंडी पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादीने घटनास्थळावर घर क्र. ४५५–ब अस्तित्वात आहे हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. अभिलेखावर दाखल असलेला असेसमेंट उतारा (नि. २७) वरुन मालमत्ता क्र. १६६१ हे सुमित्रा आत्माराम जाधव हिच्या नांवावर असल्याचे दिसून येते. सदर उतारा फिर्यादीने साक्षीदरम्यान मान्य व कबुल केला आहे. फिर्यादीच्या कथनानुसार त्याने वडिलोपार्जित घराचे तंटामुक्ती

समितीमार्फत विभाजन करुन त्यामध्ये भिंत बांधली होती. त्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. तसेच तथाकथीत घर फिर्यादी व आरोपीचे वडिलोपार्जित घर आहे हे दाखवणारा पुरावा देखील अभिलेखावर आला नाही. साक्षीदार क्र. ३ व ४ यांनी आरोपी घरातील भिंत पाडत होते असे कथन केले आहे. परंतु आरोपी स्वतः कोणत्या हत्यारांच्या सहाय्याने भिंत पाडत होते तसेच भिंत पाडण्याकरीता मजुर आले होते किंवा कसे याबाबत काहीएक कथन केले नाही. त्यामुळे सदर साक्षीदार हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत याबाबत शंका निर्माण होते. साक्षीदार क्र. ४ याने त्याची आरोपीसोबत वाकडीक असल्याचे कबुल केले आहे. साक्षीदार क्र. ३ याने त्याच्या जबाबामध्ये तसेच पुराव्यामध्ये घटनेबाबत त्याने फिर्यादीला फोन करुन कळविले असे कथन केलेले नाही. त्यामुळे घटनेबाबत फिर्यादीला साक्षीदार क्र. ३ कडून कळाले याबाबत शंका निर्माण होत आहे. फिर्यादीने घटनेवेळी तो मुंबईत होता असे कथन केले आहे. परंतु ही बाब सिध्द करणारा पुरावा त्याने अभिलेखावर आणलेला नाही. घटना दिनांक १०/४/२०१९ रोजी घडली आहे. फिर्यादीने दिनांक ११/४/२०१९ रोजी घटनास्थळाला भेट दिली तरीही घटनेची फिर्याद दिनांक १४/४/२०१९ रोजी देण्यात आली आहे. यावरुन फिर्यादीने पश्चात बुध्दीने फिर्याद दिल्याचे दिसून येते. फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये मिळकतीवरुन वाद आहेत हे स्पष्ट होते. तसेच त्यांच्यामध्ये दिवाणी दावा देखील प्रलंबित आहे असे फिर्यादीच्या पुराव्यामध्ये आले आहे. साक्षीदार क्र. ३ व ४ यांचे फिर्यादीशी चांगले संबंध आहेत व आरोपींशी वाकडीक आहे यावरुन त्यांनी दिलेली साक्ष विश्वासहार्य वाटत नाही. आरोपींविरुध्द असलेले दोषारोप सिध्द करणारा सबळ पुरावा अभिलेखावर आला नाही. अशा परिस्थितीत मुद्दा क्र. १ ते ३ चे चा निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहेत.

**मुद्दा क्र.४ करिताः**

११. वर नमुद मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्षावरुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आदेश

०१. आरोपी क्र. १ ते ४ यांना भारतीय दंड विधान कलम ३४१, ४२७, ५०४ सह ३४ अन्वयेच्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

०२. आरोपी क्र. १ ते ४ यांचे वैयक्तिक बंधपत्र व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

०३. आरोपी क्र. १ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र दाखल करुन अपीलात हजर राहण्याची ग्वाही द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.08.04 17:24:53 +0530

सावंतवाडी
दिनांकः ०४/०८/२०२६

(जा.म. मिस्त्री)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
सावंतवाडी